पूर्वा कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

# संपादकीय



## बदलत्या हवामानात संरक्षित शेतीच ठरेल लाभदायी!

डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- अल्पभूधारक शेतकऱ्यांचीही आता पॉलिहाऊसला पसंती
- गटांच्या माध्यमातून केलेली संरक्षित लागवड फायदेशीर
- रिटेल क्षेत्रातल्या कंपन्यांशी व्यावसायिक साहचर्य करता येईल
- मागणीनुसार उत्पादन आणि विपणन गटशेतीद्वारे सुलभ होईल
- शासनासह संबंधित संस्थांचा धोरणात्मक समन्वय गरजेचा
- संरक्षित शेतीला 'उद्योग' मानून तशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

पॉलिहाऊस किंवा शेडनेटमध्ये शेती करून पिकाचे संरक्षित वातावरणात उत्पादन घेण्याचे तंत्रज्ञान फार पूर्वीपासून अनेक देशांमध्ये वापरात होते. परंतु आपल्या देशामध्ये या तंत्रज्ञानाची गरज नाही असेच सर्वांना मागील एक- दोन दशकांपूर्वी वाटत होते. कारण आपल्या देशामध्ये विभिन्न हवामानांचे विविध प्रदेश असल्यामुळे वर्षभर विविध प्रकारचे उत्पादन मिळते. परंतु या विचारामध्ये बदल होऊन संरक्षित शेतीचा अवलंब मागील दोन दशकांपासून देशात, विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सुरु झाला. सुरुवातीच्या काळात संरक्षित शेतीचा अवलंब खासगी कंपन्या तसेच मोठे भांडवलदार शेतकरी यांनी सुरु केला. परंतु मागील काही वर्षांत संरक्षित शेतीकडे अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरीही आकर्षित होऊ लागला आहे. हवामानामध्ये होत असलेले बदल आणि त्यामुळे पीक उत्पादनावर होणारा परिणाम, कमी होत असलेली जमीन धारणा आणि पाण्याची उपलब्धता यांचा विचार केला तर संरक्षित शेतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. बागायत भागातील आर्थिक सुबत्ता असलेल्या शेतकऱ्यांबरोबरच जिरायत भागातील आर्थिक अडचणींना तोंड देत असलेला तरुण संरक्षित शेतीकडे वळतोय, ही चांगली बाब आहे. आजचा चांगले शिक्षण घेतलेला तरुण शेती व्यवसायापासून दूर जात असताना, त्याला आकर्षित करुन

चांगले उत्पादन मिळवून देण्याचे साधन म्हणजे संरक्षित शेती. तांत्रिक पध्दतीने शेती करून आणि कमीतकमी शारीरिक कष्ट घेऊन उत्पादन मिळाले तरच तरुण शेती व्यवसायाकडे आकर्षित होतील.

## पॉलिहाऊस हाच उत्तम पर्याय

सुरुवातीच्या काळात शेडनेटवर जास्त भर होता. परंतु आज शेडनेटच्या मर्यादा लक्षात येऊन संरक्षित शेतीसाठी पॉलिहाऊस चांगला पर्याय आहे, ही बाब लक्षात आल्यामुळे पॉलिहाऊसची संख्या वाढत आहे. संरक्षित शेती ही एकट्या शेतकऱ्याने करण्याऐवजी गटाच्या माध्यमातूनच करावी. एकट्या शेतकऱ्याला पीक उत्पादनापासून ते विक्रीपर्यंत अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. तो प्रश्न गटशेतीच्या माध्यमातून कमी होतो. खरं तर संरक्षित शेती जिल्हा - राज्य पातळीवर संघटित करुन कंपन्यांमध्ये रुपांतर करण्याची गरज आहे. रिटेल क्षेत्रामध्ये अनेक कंपन्या पुढे येत असताना शेतकऱ्यांच्या संघटना आणि कंपन्यांनी त्यामध्ये सहभागी होणे महत्त्वाचे आहे. यामुळे विक्री व्यवस्था, मागणीनुसार उत्पादनाचे नियोजन, आर्थिक उपलब्धता, शासनाचे धोरण आणि यंत्रणा, कर्ज पुरवठा करणाऱ्या यंत्रणांचे पाठबळ असे अनेक निर्णय घेण्यासाठी जिल्हा-राज्य पातळीवर एकत्र येण्याची गरज आहे. यामुळे विक्री व्यवस्थेचा महत्त्वाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. तसेच मागणीनुसार उत्पादन करण्याचे नियोजन केले तर उत्पादनाला योग्य दर मिळून हा व्यवसाय किफायतशीर होऊ शकेल.

शेतकऱ्यांच्या प्रत्येक गटाकडे पॉलिहाऊस, लहान आकाराचे प्रि-कुलिंग किंवा कमी खर्चाचे कुलिंग चेंबर पॅक हाऊस तसेच बाजारपेठेत संपर्क ठेवण्यासाठी यंत्रणा तयार करावी. रिटेल क्षेत्रामध्ये मोठी गुंतवणूक होत असताना शेतकरी समूहाकडे अशा प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या तर मोठ्या कंपन्या शेतकरी समूहाबरोबर वर्षाचा करार करु शकतील. ग्राहकाच्या मागणीनुसार उत्पादन करार केलेल्या कंपन्यांना आवश्यकतेनुसार उत्पादनाचा आराखडा शेतकऱ्यांना देता येईल. ज्याप्रमाणे कुक्कुटपालन क्षेत्रात करार शेतीमुळे ग्रामीण भागात सर्वसामान्य शेतकऱ्याकडे हा व्यवसाय फोफावला त्याच धर्तीवर किंबहुना त्यापुढे जाऊन संरक्षित शेतीमधील विक्री व्यवस्थेची श्रृंखला तयार करण्याची गरज आहे. कारण संरक्षित शेतीमध्ये अनेक प्रकारची फळे, फुले, भाजीपाला उत्पादन घेऊन त्यांची विक्री व्यवस्था करता येते. पॉलिहाऊसची संख्या वाढत असताना करार पध्दतीने पीक उत्पादन घेणे ही काळाची गरज असेल.

संरक्षित शेती करण्यासाठी प्रशिक्षण आणि वेळोवेळी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी तांत्रिक ज्ञानाची गरज भासते. पारंपरिक विस्तार यंत्रणांमधील कर्मचाऱ्यांना या विषयामध्ये पारंगत केले पाहिजे. बदलत्या हवामानामध्ये संरक्षित शेतीमध्ये केवळ रंगीत मिरची, पुष्पशेती यासारख्या एकाच पध्दतीवर अवलंबून न राहता पारंपरिक पिकांचे उत्पादन घेणेही गरजेचे आहे. बिगर हंगामी भाजीपाला उत्पादन तसेच प्रतिकूल परिस्थितीमध्ये पिकांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी संरक्षित शेती उपयुक्त आहे. परंतु आजही यासाठी लागणारे तंत्रज्ञान कृषी संशोधन संस्थांकडून तयार झालेले नाही. खरं तर यावर जास्त भर देण्याची गरज आहे.

## एकात्मिक विमा संरक्षण गरजेचे

संरक्षित शेतीला शासनाकडून भरीव मदत मिळत असून; पॉलिहाऊस/ शेडनेट उभारणी, पिकांची लागवड, पाणी व्यवस्थापन तसेच वातावरण नियंत्रित करण्याची यंत्रणा तसेच वातावरण आणि पाण्याचे व्यवस्थापन या सर्वांचा समावेश सध्याच्या अनुदान योजनेमध्ये करण्यात आलेला आहे ही चांगली बाब

आहे. अर्थात शेतकरी संरक्षित शेतीचा अवलंब करत असताना इच्छुक सर्वच शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देणे ही बाब महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांनी संरक्षित शेतीकडे बघताना एकात्मिक विचार करुन सर्व बाबींची वापर केला तरच अपेक्षित उत्पादन मिळते. अर्धवट तंत्रज्ञानाचा वापर अपयशाकडे घेऊन जातो. पिकाला लागणारी योग्य प्रमाणातील माती तसेच कोकोपीटचा वापर केला पाहिजे. कोकोपीटचा वापर करुन जास्तीत जास्त उत्पादन घेता येते. तसेच पाण्याची प्रत योग्य असणे म्हणजे क्षारता ०.५० मि.लि. मोहज् आणि सामू ७ ते ७.५ असेल तरच चांगले उत्पादन मिळेल. शेततळ्यातील पाण्याचा वापर करताना योग्य काळजी घेणे गरजेचे आहे. पाण्याची तपासणी करुनच त्याचा वापर करावा कारण तळ्यातील पाणी बाष्पीभवनामुळे कमी होत असताना पाण्याची प्रतही कमी होऊन त्याचा पीक उत्पादनावर अनिष्ट परिणाम होत असतो. संरक्षित शेतीला विम्याचा आधार देण्याची गरज निर्माण झालेली आहे. लाखो रुपये खर्च करुन शेतकरी या व्यवसायाकडे वळत असताना केवळ सांगाड्याला विम्याचे संरक्षण मिळते. परंतु अवकाळी पाऊस, गारपीट, वादळ किंवा आकस्मिक नैसर्गिक संकटामुळे पॉलिहाऊसचे प्लास्टिक पेपर तसेच शेडनेटचे अतोनात नुकसान होते. तसेच पिकांचेही नुकसान होत असते. म्हणून संरक्षित शेतीला एकात्मिक विम्याचे संरक्षण मिळणे गरजेचे आहे अन्यथा शेतकऱ्याला मोठ्या आर्थिक नुकसानीस सामोरे जाऊन त्याचे पूर्ण अर्थकारण संकटात येते.

## वित्त साहाय्यात सकारात्मकता असावी

संरक्षित शेतीकडे बघण्याच्या दृष्टिकोनामध्ये बदल होण्याची गरज आहे. याच्याकडे एक कृषी-आधारित उद्योग म्हणून बघितले पाहिजे. या उद्योगातून मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात रोजगार निर्मितीबरोबरच उत्पादनात वाढ आणि निर्यातीला चालना मिळेल. याचा विचार शासकीय यंत्रणा, आर्थिक पुरवठा करणाऱ्या यंत्रणा, संशोधन संस्था, दळणवळण व्यवस्था आणि विमा कंपन्यांनी करण्याची गरज आहे. आजही अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना आर्थिक पुरवठा करण्यासाठी बँका तयार होत नाहीत. प्रकल्प आराखडा तयार करण्यापासून ते कर्ज घेण्यापर्यंत शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते आणि त्यांना योग्य सहकार्य मिळाले नाही तर त्यांची मानसिकता खचून नैराश्य येते. अनेकदा पॉलिहाऊस उभारल्यामुळे बाजारभाव किंवा निसर्गामुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी वेळेवर कर्ज भरु शकत नाही. अशा परिस्थितीत त्याच्या कर्जाचे पुनर्गठन करुन तो थकबाकीत जाणार नाही यासाठी सकारात्मक विचार वित्तीय संस्थांनी केला पाहिजे. आजच्या ग्रामीण तरुणांना रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी ही एक मोठी संधी आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार तसेच हवामानाच्या बदलानुसार शेतीमध्ये शाश्वत उत्पादन घेत असताना तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी, शहराकडे जाणाऱ्या तरुणांचा लोंढा कमी करण्यासाठी तसेच संरक्षित शेतीला संघटित करुन कृषिक्षेत्राचा शाश्वत विकास दर वाढविण्यासाठी सर्वांनाच प्रयत्न करावे लागतील.

■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक **संजय भास्कर पवार** यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : **डॉ. भास्कर गायकवाड.**

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.